**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये सूचना.
- राज्यातील बृहन्मुंबई व नवी मुंबई वगळता उर्वरित क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करावयाच्या सुधारणा.

## महाराष्ट्र शासन

### नगर विकास विभाग

क्रमांक :- टिपीबी ४३१५ /३४७/ प्र.क्र. ११४/२०१५/(उर्वरित महाराष्ट्र )/ नवि-११
मंत्रालय, मुंबई : ४०० ३२,
दिनांक :- २५ जानेवारी, २०१८.

**शासन निर्णय** : सोबतचे शुध्दीपत्रक शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( प्रदीप गोहिल )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे

त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक शासनाच्या दिनांक १३/०९/२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालील सूचनांप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी तसेच विभागाच्या संकेत स्थळावर त्वरीत प्रसिध्द करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४) | कोणत्या जिल्हयामध्ये | सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद राज्यातील विभागामधील जिल्हयांमध्ये. |
| ५) | किती वृत्तपत्रात | एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६) | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |
| ७) | किती वेळा | एकदा |
| ८) | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिका-याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१. |

(२) संचालक,नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष/ मुल्यांकन/पुणे/ कोकण/ नाशिक/ नागपूर/ औरंगाबाद/ अमरावती विभाग.

(५) महाराष्ट्रातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त/ सर्व नगरपालिका तसेच नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी.

(६) अवर सचिव नवि-१३/नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९/नवि-१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(७) सहाय्यक संचालक, नगर रचना/ नगर रचनाकार, सर्व शाखा कार्यालये, नगर रचना विभाग.

(८) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.

( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या ५० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व ५० प्रती संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात याव्यात.)

(९) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

(१०) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी)

(११) निवड नस्ती (नवि-११)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**शुध्दिपत्रक क्र.** टिपीबी ४३१५/३४७/प्र.क्र.११४/२०१५ (उर्वरित महाराष्ट्र )/नवी-११
**दिनांक : २५ जानेवारी, २०१८.**

वाचा :- शासन सूचना क्र. टिपीबी ४३१५/३४७/प्र.क्र.११४/२०१५ (उर्वरित महाराष्ट्र )/ नवि-११,दि.३०/११/२०१७.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६ च्या अनुषंगाने प्रोत्साहन देण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करणेबाबत या विषयी मंत्रीमंडळाचे दि. १९/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्याच्या राज्यातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित क्षेत्रासाठीचे विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी वर नमूद कलम ३७ (१कक) खालील सूचना दि.३०/११/२०१७ रोजी निर्गमित केली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये कलम ३७(१कक) अन्वये फेरबलाची कार्यवाही स्वतंत्र नस्तीवर होत असून सदर फेरबदलास मंजूरी देताना पर्यटन धोरणाचे अनुषंगाने तरतुदींचा सदर विकास नियंत्रण नियमावलीस सुधारणा मंजूरी देताना अंतर्भाव होणार आहे. सबब, राज्यातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित क्षेत्रासाठीचे विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी कलम ३७ (१कक) खालील सूचना दि.३०/११/२०१७ रोजी निर्गमित केलेली सदर सूचना नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू करण्याची आवश्यकता नाही.

तथापि, सदर बाब दि. ३०/११/२०१७ रोजीची सूचना निर्गमित करताना उल्लेख करण्याचे राहून गेले आहे. तरी सदर सूचनेचे शिर्षक तसेच सूचनेत जेथे आवश्यक तेथे सदर सूचना ही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू नाही, असे नमूद करण्यासाठी शुध्दीपत्रक पारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार दि. ३०/११/२०१७ रोजीचे उर्वरित महाराष्ट्र क्षेत्रासाठीचे कलम ३७(१कक) खालील सूचनेत खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यासाठी शुध्दीपत्रक काढण्यात येत आहे.

## शुध्दीपत्रक

शासन सूचना क्र. टिपीबी ४३१५/३४७/प्र.क्र.११४/२०१५ (उर्वरित महाराष्ट्र )/नवि-११, दि.३०/११/२०१७ (तसेच सम क्रमांकाचे व दिनांकाचे इंग्रजी मधील Notice ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| तपशिल | या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|
| शासन सूचनापत्र दि. ३०/११/२०१७ व त्यासाबतचे चे मुखपत्राचे शिर्षक. | • राज्यातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करावयाच्या सुधारणा. | • राज्यातील बृहन्मुंबई **व नवी मुंबई** वगळता उर्वरित क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करावयाच्या सुधारणा. |
| शासन सूचनापत्र दि. ३०/११/२०१७ चे | महाराष्ट्र बृहन्मुंबई वगळता उर्वरित राज्यातील सर्व महानगरपालिकांचे | महाराष्ट्र बृहन्मुंबई **व नवी मुंबई** वगळता उर्वरित राज्यातील सर्व |

| | | |
|---|---|---|
| मुखपत्राचे प्रती क्र. ५ | आयुक्त/ सर्व नगर पालिका तसेच नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी. | महानगरपालिकांचे आयुक्त/ सर्व नगर पालिका तसेच नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी. |
| शासन सूचनापत्र दि. ३०/११/२०१७ सोबतचे परिशिष्ट-अ | Following modification are proposed to be inserted as appropriate place and wherever applicable in existing Development Control Regulations of respective Authorities (Rest of Maharashtra excluding Gr. Mumbai. | Following modification are proposed to be inserted as appropriate place and wherever applicable in existing Development Control Regulations of respective Authorities (Rest of Maharashtra excluding Gr. Mumbai **and Navi Mumbai** |
| शासन सूचनापत्र दि. ३०/११/२०१७ सोबतचे परिशिष्ट-ब चे रकाना क्र. ३ चे शिर्षक. | Name of the Urban Local Bodies / Development Authority (Rest of Maharashtra excluding Gr. Mumbai) | Name of the Urban Local Bodies / Development Authority (Rest of Maharashtra excluding Gr. Mumbai / **Navi Mumbai**) |
| शासन सूचनापत्र दि. ३०/११/२०१७ सोबतचे परिशिष्ट-ब चे अनु क्र.१ रकाना क्र. ३ . | All Municipal Corporations (Excluding Municipal Corporation of Gr. Mumbai), Municipal Counciles / Nagar Panchayat. | All Municipal Corporations (Excluding Municipal Corporation of Gr. Mumbai **and Navi Mumabi**), Municipal Counciles / Nagar Panchayat. |

शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्र. टिपीबी ४३१५/३४७/प्र.क्र.११४/२०१५ (उर्वरित महाराष्ट्र )/ नवि-११,दि.३०/११/२०१७मधील वरील शुध्दीपत्रका व्यतिरिक्त इतर नमूद तपशिलामध्ये मध्ये बदल करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( प्रदीप गोहिल )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**